मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ पोटकलम १ प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणेस द्यावयाचा ना हरकत दाखला

# ग्रुप ग्रामपंचायत बेहेरे

## ता. कल्याण, जि. ठाणे.

ग्रुप ग्रा.पं. बेहेरे, खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे जा.क्र. जा.क्र. दि.

दिनांक 5/8/2023

श्री. अमोल दिंगबर जोशी व इतर यांचे कु. मु. धा. मे. जे. के. टी. ग्रुप तर्फे भागीदार
श्री. रझी निसार कुंगळे व इतर रा. राया, पो. नडगांव, ता. कल्याण, जि. ठाणे.

यांसी

संदर्भ- आपला दि. 9/2/2023 चा अर्ज

आपला घर बांधणेबद्दलचा, दुरुस्तीचा, फेरफार करण्याचा किंवा वाढविण्याचा अर्ज ता. रोजी मिळाला. त्याप्रमाणे आपणांस कळविण्यांत येते कीं, पंचायत ठराव नं. 61 ता. 31/03/2023 च्या अन्वये इमारत बांधण्यास, दुरुस्त करण्यास, फेरफार करण्यांस किंवा वाढविण्यास(रेव्हिन्यू खात्याचे परवानगीस पात्र राहून) १९५८ चा ग्रामपंचायत कायदा कलम ५२ व ५३ मधील तरतुदीस अधिन राहून खालील अटीवर नाहरकत दाखला देण्यांत येत आहे.

वाचले:-

१. मे. जिल्हाधिकारी साहेब ठाणे. यांचेकडील आदेश नं. क्र. महसुल/कक्ष-१/ए-७/बां.प./खडवली-कल्याण एस.आर. -०३/२०२२ जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे. दि. ९/१/२००३

२) सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे. यांचे कडील प्रत्र जाक्र. बां.प./मौजे खडवली/ ता. कल्याण,/ स. न. १/३/ससंठाणे/१२८२/दि. ०२/०५/२०२२

## कारणे/अटी

बांधकाम परवानगी मौजे खडीवली सर्वे/ हिस्सा १/३ बिनशेती क्षेत्र ४४६७.२४ चौ.मि. पैकी अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र १०००६.६२ चौ. मी.

इमारत क्र. १ प्रयोजन रहिवास मजले अंशतः स्टील्ट-अंशत तळ-७ मजले एकूण -४२६९.७५ चौ.मी.

इमारत क्र. २ प्रयोजन रहिवास मजले तळ-७ मजले एकूण -२०४८.३२ चौ.मी.

इमारत क्र. ३ प्रयोजन रहिवास मजले अंशत तळ - अंशतः स्टील्ट-७ मजले एकूण -३५५२.५८ चौ.मी.

एकूण - ९८७०.६५

इमारत क्र. ४ प्रयोजन खुल्या जागेतील क्लब हाऊस मजले स्टील्ट-२ मजले एकूण -६६.८५ चौ.मी.

१) सदरहून जागा ही आपल्या मालकीची आहे. असे गृहीत धरुन खालील शर्तीनुसार मे. जिल्हाधिकारी साहेब ठाणे. यांचेकडील आदेश नं. क्र. महसुल/कक्ष-१/ए-७/बां.प./खडवली- कल्याण एस.आर. -०३/२०२२ जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे. दि. ९/१/२००३ चे अधिन राहून बांधकाम करणेस नाहरकत परवानगी देणेंत येत आहे.

२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कमल ५२ पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासून १ वर्षाचे आत बांधकामस सुरुवात करावी तसचे पोट कलम ४, ५, ६ च्या तरदुतीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहिल.

३) कलम ५३ च तरतूदीचे संपूर्ण बंधन आपलेवर राहिल त्यानुसार सांडपाण्याची व्यवस्था करणे सार्वजनिक रस्त्यास बाध येणार नाही. अशी व्यवस्था करणे वगैरे आपलेवर बंधन राहिल.

४) बांधकाम करणेपूर्वी आवश्यक असलेली महसुल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असून स. नं.ची जागा एन. ए. (अकृषक) झालेशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

(मागे पहा)

५) जागेच्या मालकीची वहिवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगिती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही तोपर्यंत स्थगिती कायम राहिल. सदर वादाचे निराकरण अर्जदाराने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगिती रद्द करणे बाबत परवानगी घेतले शिवाय बांधकाम करता कामा नये.

६) बांधकामाचा कोणताही भाग सरकारी अथवा दुसऱ्याचे जागेत गेल्यास तो आपणांस स्वखर्चाने मोकळा करुन देणें भाग पडेल.

७) गांवठाणाव्यतिरिक्त खाजगी/ सरकारी अगर रस्त्याचे बाजूस बांधकाम करतांना संबंधित खात्याची परवानगी असलेशिवाय बांधकाम करु नये.

८) आपल्या इमारतीच्या सांडपाण्याची व्यवस्था आपणांस स्वतःचे जागेत अगर तुमच्या इमारतीपासून पंचायतीचे मुख्य गटारापर्यंत स्वखर्चाने करणेची आहे.

९) घराचे बांधकाम सुरु करणेपूर्वी सेफ्टी टँक आराखडयाप्रमाणें बांधणेंत यावे.

१०) पाणी पुरवठा देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची रहाणार नाही.

११) बांधकाम करतांना शेजाऱ्यास अगर सार्वजनिक वहातुकीस अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

१२) होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व वहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

१३) इमारतीचे बांधकाम करतांना सर्व बाजूस किमान १० (दहा) फुट जागा सोडावी आणि ज्या बाजूस रोड असेल त्या बाजूस १५ (पंधरा) फुट जागा सोडावी.

१४) बांधकामास लागणारे पाणी ग्रा. पं. च्या मालकीच्या सार्वजनिक विहीर, तलावातून पंचायतीचे परवानगीशिवाय घेता येणार नाही.

१५) बांधकाम सुरु करणेपूर्वी पंचायतीस कळविणे भाग आहे. एक वर्षाचे आंत बांधकाम सुरु न केल्यास, नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.

१६) बांधकाम साहित्य पंचायतीचे आगाऊ परवानगीशिवाय सार्वजनिक रस्त्यावर ठेवता येणार नाही.

१७) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा / घराचा वापर करु नये.

१८) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कर आकारणीसाठी मुल्यांकन कळवावे.

१९) अर्जात दर्शविल्याप्रमाणे स.नं. ..खडावली.....9..हि. नं. ..2......................मधील जागेत ...................प्रेम प्रभाळे...................यामापाचे घर इमारत बांधणेस वरील अटीस, नियमांस बांधील राहून नाहरकत दाखला देण्यांत येत आहे.

२०) नियमानुसार योग्य मार्जिन सोडून आपले स्वतःचे जागेतच बांधकाम करणें आवश्यक आहे.

२१) वरील शर्तींनुसार दिलेली परवानगी आपणांस मान्य नसल्यास, मे. मुख्यकार्यकारी अधिकारी, जि. प. ठाणे. यांचेकडे दोन माहिन्याचे आंत अपील करावे.

..........................................................................................................................

..........................................................................................................................

| | |
|---|---|
| ग्रामविकास अधिकारी<br>ग्रामपंचायत वेहरे. | सरपंच<br>दिपाली प्रदिप शेलार<br>ग्रुप ग्रामपंचायत वेहरे,<br>ता.कल्याण, जि. ठाणे |